# <u>प्रेस नोट</u>

**आरोपी लोकसेवक श्री. संदेश चंद्रशेखर सांबरे वय ३५ वर्ष, पद- कनिष्ठ सहायक (लेखा) मुख्य लेखा व वित्त विभाग,कार्यालय जिल्हा परीषद गोंदिया (वर्ग-३) रा. पंचायत समिती कॉलोनी, गोंविदपुर रोड गोंदिया ता. जि. गोंदिया यांनी लाच रक्कम ५०,०००/-रु. मागणी करुन, तडजोडीअंती ४५,०००/-रु. स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडुन कार्यवाही केलेबाबत.**

यातील तक्रारदार हे दि. ३१/०५/२०२६ रोजी सेवानिवृत्त होणार असुन, तक्रारदार यांची सर्व पेन्शन ची कागदपत्रे मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालय जिल्हा परीषद गोंदिया येथे पाठविले आहे. तक्रारदार हे दि. ०७/०५/२०२६ रोजी मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालय जिल्हा परीषद गोंदिया येथे जावुन पेन्शन चे काम करणारे आलोसे श्री संदेश सांबरे, कनिष्ठ लिपीक (लेखा) जिल्हा परीषद गोंदिया यांना भेटुन त्याची सेवा पुस्तीका दाखविली असता, आलोसे श्री संदेश सांबरे यांनी सेवा पुस्तीका तपासुन तुमचा पे फिक्सेशन मध्ये त्रुटी असून तुमच्याकडे १९२,०००/- रु. रिकवरी निघत आहे ही रिकवरी वाचवायचे असेल व पेन्शन चे काम लवकर करायचे असेल तर ५०,०००/- रु. दयावे लागतील असे म्हणाले. तक्रारदार यांना गैरअर्जदार मागत असलेले पैसे ही लाच रक्कम असल्याची खात्री पटल्यावर त्यांनी दिनांक ११.०५.२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे येऊन आलोसे विरुध्द तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक ११.०५.२०२६ रोजी सापळा अधिकारी यांनी तक्रारदार यांना पंचासह मुख्य लेखा व वित्त अधिकारी कार्यालय, जिल्हा परीषद गोंदिया येथे जाऊन आलोसे यांचेकडे पाठविले असता तक्रारदार यांचे सेवानिवृत्तीचे कागदपत्रे बनवुन पेन्शन लवकर मिळवुन देण्यासाठी तसेच तक्रारदार यांचे पे फिक्शेसन त्रुटी असुन तक्रारदारकडे १,९२,०००/- रु. ची रिकवरी निघत आहे ही रिकवरी वाचवण्यासाठी आरोपी लोकसेवक यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन तक्रारदार यांच्याकडे ५०,०००/-रु. ची लाच मागणी करुन तडजोडीअंती ४५,०००/- रु. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक ११.०५.२०२६ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक श्री. संदेश चंद्रशेखर सांबरे वय ३५ वर्ष, पद- कनिष्ठ सहायक (लेखा) मुख्य लेखा व वित्त विभाग, जिल्हा परीषद गोंदिया (वर्ग-३) रा. पंचायत समिती कॉलोनी, गोंविदपुर रोड गोंदिया ता. जि. गोंदिया यांनी तक्रारदार यांच्याकडुन ४५,०००/-रु. लाच रक्कम पंच क्र. १ यांच्या समक्ष स्विकारुन गैरफायदा घेतल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामीण जि. गोंदिया येथे दि. १२/०५/२०२६ रोजी गु. र. क्र. २७३ /२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ (संशोधन अधिनियम-२०१८) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, आरोपी यास दि. १२/०५/२०२६ चे ०६ .१० वा.अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. डॉ. दिगंबर प्रधान पोलीस अधीक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्रीमती माधुरी बाविस्कर मॅडम, अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर, मा.श्री. विजय माहुलकर अपर पोलीस अधिक्षक ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात पो.नि.उमाकांत उगले, पो.नि.अरविंद राऊत, स.फौ. चंद्रकांत करपे, पो.हवा. संजय बोहरे, पो.हवा मंगेश कहालकर, ना.पो.शि. संतोष शेंडे, अशोक कापसे, संतोष बोपचे, प्रशांत सोनवाने, कैलाश काटकर, मनापोशि. संगिता पटले, रोहीणी डांगे, चालक दिपक बाटबर्वे सर्व लाप्रवि. गोंदिया यांनी केली.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांची लोकसेवका विरुध्द तक्रार असल्यास त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया येथे खालील माध्यमाद्वारे संपर्क करावा. त्यांच्या तक्रारीची योग्य ती दखल घेण्यात येईल.

Toll Free No :-1064
Landline No :- 07182/251203
Whatsapp No:- 9209041064
Email Id :- acbgondia@gmail.com

(उमाकांत उगले)
पोलीस निरीक्षक
प्रभारी, पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गोंदिया